
समस्त महाराष्ट्रीय

# ब्राह्मण पोटशाखा

(एक समग्र समाजशास्त्रीय अध्ययन)




लेखक - डॉ.अभयकुमार व्यंकटेश सावजी

सुखद प्रकाशन
नागपूर

**7) पोटशाखा समाजातील आजपर्यंतच्या इतिहासातील काही प्रमुख व्यक्ती (यायादीतील त्रुटी व चुकांबद्दल क्षमा करावी अशी विनंती.) बाह्य जगाला पोटशाखा समाज सहजतेने ओळखू येण्यासाठी –**

– समर्थ रामदास स्वामी
– दादोजी कोंडदेव
– गागाभट्ट
– हेडगेवार, संस्थापक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
– बाळासाहेब देवरस, माजी सरसंघचालक
– वामन हरिहर राजंदेकर, पंचागकर्ते
– बाबासाहेब आमटे, आनंदवन, वरोरा
– मनोहर जोशी, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र
– शरद जोशी, संस्थापक व प्रमुख, शेतकरी संघटना
– गुरुराज देशपांडे, संगणक व्यवसायात अमेरिकेमध्ये अग्रेसर
– सौ. सुमतीबाई सुकळीकर, सामाजिक कार्यकर्त्या
– दादासाहेब धर्माधिकारी, सुप्रसिद्ध सर्वोदयी

*(संपूर्ण साक्षरता असणे, सुशिक्षित असणे, पौरहित्य, सावकारी शेती व्यवसाय, नोकऱ्या, व्यापार हे व्यवसाय असणे आर्थिक मध्यम, उच्च–मध्यम, कनिष्ठ–मध्यम आणि उच्च या वर्गात मोडणे हे सर्वच ब्राह्मण पोटशाखांचे समान गुण असल्याने त्याचे विवरण सूची कोणत्याही अनुबंधात घेतले नाही.)*

।। श्री ।।

**श्रीमती विद्या अरुण राजंदेकर यांचा अल्पपरिचय**



ज्योतिषरत्न श्रीमती विद्या अरुण राजंदेकर, विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यामध्ये शेंबा या गावी जन्म, बी.एससी., राजंदेकरकृत पंचांगाच्या संपादिका, हल्ली वास्तव्य नागपूर, पति श्री.अरुण वामनराव राजंदेकर हे व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट, होते.पंचाग निर्मिती सारख्या जटील विषयावर प्रभुत्व असणाऱ्या कर्तृत्ववान श्रीमती विद्याताई एक कर्तव्यदक्ष गृहिणीपण आहेत. अरुणरावांच्या यशस्वी जीवनात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. श्रीमती. विद्याताई राजंदेकरांचे "महाराष्ट्रीय पंचांग" हे एक सर्वश्रेष्ठ सर्वमान्य पंचांग आहे. सासऱ्याचे महान कार्य सुनेने पुढे चालविण्याची परंपरा श्रद्धेय अहल्याबाई होळकरांच्यामुळे महाराष्ट्राला परिचितच आहे.

अध्याय क्रमांक-३

कऱ्हाडे ब्राह्मण

# कऱ्हाडे ब्राह्मण ही कावेरीची कृष्णा-कोयनेस भेट

**'कऱ्हाडे ब्राह्मण'** ही महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण व आदरणीय ब्राह्मण जमात आहे. त्यांचा इतिहास सुसंगतवार माहीत झाला की त्यांच्याबद्दलचा आदर अनेक पटीनं वाढतो. कऱ्हाडे ब्राह्मण हे मूळचे कर्नाटकातले, या मुद्यावर जवळपास एकमत आहे.

## कर्नाटकातील उगमाचे पुरावे

कर्नाटकातील उगमाची लक्षणे व खुणा आजही कऱ्हाडे ब्राह्मणात बऱ्याच सुलभतेने शोधून काढता येतात.

1. कऱ्हाडे ब्राह्मणाच्या वास्तव्याचा प्रभाव महाराष्ट्राच्या कर्नाटक सीमा भागावर विशेष जाणवतो.
2. "आम्ही (भट मंडळी) मूळ कर्नाटकातील" असे विख्यात कवी सुरेश भट (सारासार–लोकमत 4.2.99) यांनी त्यांच्या कऱ्हाडे ज्ञातीच्या संदर्भात लिहिले आहे. प्रखर राष्ट्रवादी कविवर्य सुरेश भट हे कऱ्हाडे कुलोत्पन्न आहेत.
3. The word Karhade is derived from the region Karhataka. The Karhataka region extended from Tungabhadra to Narmada Godavari" -Karhade Brahman. People of India. Page 107 Goa (Anthropological Survey of India)
4. "असा हा करहाटक प्रांत तुंगभद्रेपासून नर्मदा गोदावरी नद्यांपर्यंत पसरलेला होता. कोकणात जाण्यापूर्वी **ते या प्रांताचे रहिवासी असले पाहिजेत व तेथूनच ते कोकणांत उतरले असले पाहिजे हे निर्विवाद व निश्चितपणे ठरते.**" (पृ.5) "कऱ्हाडे लोकांची वस्ती समुद्रकाठी नसून सह्याद्रीचे पायथ्यापासून पश्चिमेकडे वाढत गेली आहे, असे सहज दिसून येते. (पृ.21) –वि. वा. आठल्ये.

5. "कऱ्हाडे ब्राह्मण हे प्रारंभापासून कोकणचे रहिवासी होते आणि कोकणात स्थलांतरित झाले नाही." हे मत स्पेशल चुकीचे व आधाररहित आहे. "एवंच हे मत विचाराहार्य नाही हे सांगावयास नकोच (पृ.36) –वि.वा. आठल्ये कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास तृतीय आवृत्ती 1992.

6. करहाटक किंवा कर्नाटक प्रांताची उत्तर सीमा बदलती व अनिश्चित राहिली असली तरी दक्षिण सीमा कर्नाटकातील तुंगभद्रा होती यावर सर्व अभ्यासकांचे एकमत आहे. करहाटक प्रान्ताचा दक्षिण दिशेतील विस्तार तुंगभद्रेच्या दक्षिणेलाही कावेरी नदीपर्यंत असावा असे बऱ्याच अभ्यासकांना वाटते. कावेरी नदीच्या तीरावरील विद्वान ब्राह्मणांचे काही उल्लेख हे कऱ्हाडे ब्राह्मणांच्या पूर्वजांच्या संदर्भातून असावे, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे.

7. ज्ञात काळापासून तो बिज्जल–बसवेश्वर संघर्ष काळापर्यंत (इ. स. 1165 पर्यंत) कऱ्हाडे ब्राह्मण 'स्मार्त ऋग्वेदीय ब्राह्मण' च्या स्वरूपात कृष्णा नदी ते कावेरी नदीपर्यंतच्या संपूर्ण कानडी मुलुखात विकीर्ण विखुरलेले होते. कऱ्हाडे ब्राह्मण ही कावेरीची कृष्णा–कोयनेस मधुर भेट आहे.

8. 'करहाटक' हा शब्द 'कर्नाटक' या प्राचीन संस्कृत शब्दाचे प्राकृत रूपांतर आहे. कर्नाटक.......कर्नाःटक......कराटक........कऱ्हाटक........करहाटक या अवस्थांमधून हे रूपांतर झाले. त्यामुळे 'करहाटक' आणि 'कर्नाटक' या समानअर्थी पर्यायी संज्ञा आहेत. एका शब्दांचे दोन वेगळे उच्चार आहेत व संपूर्ण कन्नड भूभागाला लावल्या जात. या करहाटक प्रदेशात राहणाऱ्या ऋग्वेदी स्मार्त ब्राह्मणांना इ. स. 1165 पर्यंत 'करहाटक ब्राह्मण' म्हणून ओळखल्या जाई आणि त्यांची मातृभाषा कानडी असे.

## प्रथम (आद्य) स्थलांतर

इ. स. 1151 ते 1168 पर्यंतच्या बिज्जल बसवेश्वर कालखंडात कर्नाटकात पराकाष्ठेची अराजकता व हिंसा माजली. बिज्जल हा जैनपंथीय कलचुरी सम्राट व त्याचा बसवेश्वर हा लिंगायत पंतप्रधान यांनी परस्परांना ठार मारण्याची कारस्थाने पूर्णत्वास नेली. शैव, वैष्णव आणि जैन या तीन पंथीयांमध्ये त्रिकोणी, भीषण, हिंसक संघर्ष झाले. दक्षिण भारताच्या आजपर्यंतच्या इतिहासात इतका हिंसाचार व इतकी अराजकता दुसऱ्या कोणत्याही कालखंडात बहुधा झाली नसावी. अनेक जाती–जमातींनी या कालखंडात कर्नाटकातून व कर्नाटक सीमेवरून स्थलांतर केले. "वरील कलचुरी राज्य नष्ट होता राजकुल व राजदरबारी मंडळी कोकण प्रांताचे सेलार राजे जे कलचुरी राजाचे स्नेही होते, त्यांच्या मुलुखात कोकण, महाराष्ट्र प्रांती आश्रयास उतरली." –रा. यं. देशमुख, प्रभुकुल वैभव प्र. इ. स. 1970 पृष्ठ 10. 'कऱ्हाड :– 11 व्या शतकात हे शेलारांचे राज्य होते.' –म.ज्ञानकोष 10 / 141.



करहाटक ब्राह्मणांचे स्थलांतर नेमके कऱ्हाडलाच कां झाले ? या प्रश्नाचे उत्तर बिज्जल (कलचुरी) राजा आणि कऱ्हाडचे तत्कालीन राजे शेलार यांच्या घनिष्ठ मैत्रीमुळे हे आहे. या राजांच्या मैत्रिसंबंधामुळे करहाटक ब्राह्मणांच्या आद्य स्थलांतराची कालनिश्चितीसुद्धा सुस्पष्ट होते.

12 व्या शतकाच्या या बिज्जल बसवेश्वर संघर्ष कालखंडात स्मार्त ऋग्वेदी करहाटक ब्राह्मण हिंसाचार व अराजकतेच्या भीतीने कर्नाटकातील विविध गावांमधून ती गावे कायमची सोडून देऊन कृष्णा व कोयना नद्यांमधील दुआबामधील सुरक्षित जागी (Concentrate) केन्द्रित झाले, एकवटले. या करहाटक ब्राह्मणांच्या पुनर्वसन वसाहतीला, छावणीला बिऱ्हाड, वऱ्हाड ह्या धर्तीवर 'कऱ्हाड' हे नाव मिळाले. आड–आडोसा हा शब्द प्राकृतात साधारणपणे तात्पुरत्या आश्रयस्थानाला लावतात. वराचा लग्नसमारंभातील कालावधीमध्ये मुक्कम असतो ते स्थान म्हणजे वऱ्हाड. जो मालक नाही केवळ भाडेकरू आहे त्याच्या तात्पुरत्या आश्रयस्थानाला म्हणतात बिऱ्हाड. त्यानुसार कर्नाटक–कराटक मधून आलेल्यांच्या कृष्णा कोयनेच्या संगमाजवळ उभारलेल्या आश्रयस्थानाला–निर्वासित छावणीला "कऱ्हाड" नांव मिळाले. "कऱ्हाडे" या शब्दाच्या जडणघडणावरून कऱ्हाड हे कऱ्हाडे ब्राह्मणाचे आद्य मूळ स्थान नाही. स्थलांतर क्रियेतील एक पवित्र श्रद्धेय स्थानक आहे. मूळचे ते दुसरीकडलेच आहेत. संपूर्ण कर्नाटकातील विविध विखुरलेल्या भागातून स्थलांतरित होऊन कऱ्हाडला एकत्रित झाले आहेत हे लक्षात येते.

देवगिरी यादवाच्या कालखंडात महाराष्ट्रामध्ये कर्नाटकाबद्दल विनाकारणच भयंकर अप्रीती निर्माण झाली होती. इतकी की "महाराष्ट्री असावे. कानड देशा न जावे" असे चक्रधर स्वामींना त्यांच्या शिष्यांना आदेशस्वरूप सांगावे लागले. या कर्नाटकाबद्दलच्या अप्रीतीचा उपसर्ग न व्हावा म्हणून कऱ्हाडे ब्राह्मणांनी आपला कर्नाटकी उगम विसरावा असा प्रयत्न काही काळ झाला. तथापि, कर्नाटकाची ही अकारण कथाकथित बदनामी करण्याचा उद्देश केवळ श्री विठ्ठलाच्या भक्तीचा प्रभाव कमी करण्याकरिता आहे हे सर्वांच्याच लक्षात आले त्यामुळे कऱ्हाड्यांनी आपल्या कर्नाटकी उगमाचा इतिहास म्हणून योग्य तो अभिमान धरावा व तसे बुलंद आवाजात सांगावे हे सर्वांनाच योग्य व

आवश्यक वाटू लागले. कऱ्हाडे ब्राह्मण : कऱ्हाड या गावाजवळ त्यांची वसाहत 12 व्या शतकात होती. –डॉ. इरावती कर्वे. 'कऱ्हाड' हा शब्द पुनर्वसनानंतर उत्पन्न झाला. पुनर्वसनापूर्वी अस्तित्वात नव्हता. या पुनर्वसनानंतर उदयास आला व झपाट्याने लोकप्रिय झाला. 'कऱ्हाड' हा शब्द पुष्कळदा कराड असाही लिहिल्या जातो. करहाटक हे एका संपूर्ण प्रांताचे, एका विशाल विस्तृत भूभागाचे नाव आहे, तर कऱ्हाड हे एका गावाचे नाव आहे. 'करहाटक ब्राह्मण' आणि 'कऱ्हाडे ब्राह्मण' या थोर ब्राह्मण जातीच्या इतिहासातील दोन अवस्था (Stages) आहेत.

अल्प लोकसंख्या आणि अतिविशाल भूभागावर विकीर्ण स्वरूपात विखुरलेले असणे या दोन गोष्टींमुळे या स्थलांतरापर्यंत या करहाटक ब्राह्मणांना Distinctive Entity विशेष प्रमाणात नव्हती. स्थलांतराच्या इष्टापत्तीमुळे ती निर्माण झाली. 'कऱ्हाडे ब्राह्मण' ही संज्ञा उदयास आली. 'कऱ्हाडे ब्राह्मण' ह्या शब्दांनी या समाजाला एक प्रखर अस्मिता मिळाली. पूर्वीच्या करहाटक ब्राह्मणांची मातृभाषा कानडी असे ती आता मराठी झाली. महाराष्ट्राला योगदान देणारे त्यांचे नवीन उज्ज्वल पर्व उदयास आले. कऱ्हाडमधून हे लोक पुढे कोकणात उतरले. कोकणातील लोकांनी 'कऱ्हाड' या तोपर्यंत प्रसिद्ध झालेल्या नावावरून आलेले म्हणून त्यांना 'कऱ्हाडे ब्राह्मण' असे वारंवार संबोधले व 'कऱ्हाडे ब्राह्मण' ही संज्ञा वज्रलेप करून टाकली.

हिंसाचाराच्या अतिसंभाव्य भीतीमुळे अधिक सुरक्षित उपलब्ध ठिकाणी हे स्थलांतर करावे लागले तरी प्रत्यक्ष हिंसाचाराची भीषणता कऱ्हाडे ब्राह्मणांना अनुभवावी लागली नाही. दंग्याधोप्याचे चटके बसले नाहीत. दूरदृष्टी आणि परिस्थितीचे यथार्थ आकलन व पूर्वानुमान यामुळे हिंसाचाराचा वणवा प्रत्यक्ष येऊन पोहचण्यापूर्वीच व्यवस्थित रीतीने, चतुर पद्धतीने यशस्वी पलायन करता आले, असे म्हणतात. त्यामुळे स्थलांतर करताना पैसा–अडका, दागदागिने आणि अस्थावर संपत्ती बऱ्याच प्रमाणात घेऊन जाता आली. शिवाय पुनर्वसनासाठी त्यांना लाभलेला दोन नद्यांमधील हा दुआब भाग बराच सुपीक व सुरक्षित होता. त्यामुळे कऱ्हाडे ब्राह्मणांना हे स्थलांतर नेहमी निराधार, निर्वासित आणि शरणार्थींना होते तितके क्लेशकारक झाले नाही. त्यामुळे स्थलांतरित जमातींमध्ये सामान्यतः निर्माण होणारे अती काटकसर, अतिसावधपणा व चिव्वटपणा आदि गुण कऱ्हाडे ब्राह्मणांमध्ये त्या मानाने विशेष प्रमाणात उत्पन्न झाले नाहीत. गुणांची सुवर्णमध्यता राहिली.



## द्वितीय स्थलांतर

कृष्णा, कोयना, दुआबमध्ये काही काळ काढल्यावर बरेच कऱ्हाडे कुंभार्ली घाट–खिंडीमधून दक्षिण कोकणात उतरले. 'कऱ्हाड.....कऱ्हाड या गावाजवळ एक वसाहत 12 व्या शतकात होती......12 व्या अगर 13 व्या शतकात केव्हातरी मोठ्या संख्येने ते समुद्रकिनाऱ्याच्या पट्टीत वस्ती करण्यास गेले... .डॉ. इरावती कर्वे हि. स. ए. अ. 21. 'कऱ्हाडातून आलेले म्हणून कोकणातील लोक त्यांना कऱ्हाडे म्हणू लागले. रत्नागिरी जिल्ह्याच्या कऱ्हाड्यांना शिलाहार राजांनी तिकडे नेले...... गोमंतकातील कऱ्हाड्यांना कमलादेवी व माधव मंत्री यांनी नेले' –हा. भा. स. कोश. बिज्जलपूर्व काळापासूनच पैठणला बरीच वर्षे स्थायिक असलेले नृसिंह भट्ट हे विद्वान कऱ्हाडे ब्राह्मण याच काळात स्थलांतरित होऊन संगमेश्वरजवळ मावळणे येथे पुनर्वसित झाले. त्यांच्या वंशजांना मावळणकर हे उपनाव मिळाले.

कोकणात गेल्यावर बऱ्याच कऱ्हाडे ब्राह्मणांनी आपल्या विद्वत्तेच्या सामर्थ्यावर शिलाहार नृपतीची राजकृपा मिळविली. 'शिलाहारांच्या दानपत्रांमध्ये ऋग्वेदाचे प्राचुर्य आहे. त्यापैकी बहुतेक करहार (कऱ्हाड) हून आले होते. काही पूर्वीच येऊन कोकणात स्थायिक झाले होते. सध्याही अशा ब्राह्मणांची संख्या कोकणात विपुल आहे.' (–डॉ. वा. वि. मिराशी. शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख प्र. इ. स. 1974 पृ. 90.) या कृपाप्राप्त असामान्य विद्वान कऱ्हाडे ब्राह्मण पंडितामध्ये त्यांच्या कन्नड मुलुखातील मूळ गावाबद्दलचा अभिमान अजूनही कायम असल्याने ताम्रपटात त्यांचा उल्लेख 'कऱ्हाडे ब्राह्मण' असा न करता 'करहाटक ब्राह्मण' असा केला गेला असता तरी शिलाहारांच्या राजवटीत 'कऱ्हाडे ब्राह्मण' ही संज्ञा सर्वमान्य व लोकप्रिय झाली होती. बरेच कऱ्हाडे महसूल खात्यात महत्त्वाचे अधिकारी होते.

शिलाहारांच्या अस्तानंतर ही दानपत्रे बंद झाली. ताम्रपटातील उल्लेख काहीकाळ येईनासे झाले. तरीपण कोकणातील कऱ्हाडे ब्राह्मणांचे महत्त्वपूर्ण अस्तित्व अबाधितच राहिले. "शिलाहाराच्या राजवटीत कऱ्हाडे उदयाला आले आणि त्यांच्या नाशाबरोबरच कऱ्हाड्यांचे उच्चाटन झाले." हे विधान संपूर्णपणे चुकीचे आहे. हे चक्षुर्वैसत्यम पद्धतीने आजही पडताळून पहाता येते. स्थूल अंदाजानुसार आजही 10 ते 15 टक्के कऱ्हाडे कोकणातच राहतात. कऱ्हाडे ब्राह्मणांच्या शेती करण्याच्या पद्धतीवर वेगळा कर्नाटकी प्रभाव दिसून येतो. ते एकतर पाटाचे पाणी वापरतात किंवा विहिरीवर लाट किंवा ओक्ती लावतात. बैलरहाट किंवा पाय रहाट वापरत नाही.

कऱ्हाडे ब्राह्मणांच्या या कऱ्हाडहून कोकणात जाण्याच्या प्रकाराला त्यांचे द्वितीय स्थलांतर असे निश्चित म्हणता येईल. तथापि त्याला Migration पेक्षा Shifting स्थलांतरापेक्षा "स्थानबदल" असे मानणे अधिक योग्य होईल. ही स्थान बदलण्याची क्रिया हळूहळू अनेक दशके चालू होती. "क" हे मुळाक्षरांमधील आद्य व्यंजन. "क" अक्षराला कऱ्हाड्यांच्या प्राचीन इतिहासात अभावित महत्त्व प्राप्त झाले आहे. "कावेरी, कर्नाटक, करहाटक, कृष्णा, कोयना, कऱ्हाड, कोकण."

बिज्जल बसवेश्वर संघर्षकाळात कऱ्हाडे ब्राह्मणांचे काही पूर्वज कऱ्हाड प्रमाणेच गोव्यामध्ये स्थलांतरित झाले असावेत. बा. द. सातोस्करांच्या मते कऱ्हाडे ब्राह्मण गोव्यामध्ये बऱ्याच पूर्वीपासून कायम वास्तव्यास आहे, असे मानणेही चुकीचे होणार नाही.

## देवगिरी यादव कालखंड

शिलाहार आणि देवगिरी ह्यांचे वैर असले तरी शिलाहारांच्या अस्तानंतर कऱ्हाडे ब्राह्मणांनी देवगिरी यादव राजवटीशी चातुर्याने जुळवून घेतले. कोकणात न जाता कृष्णा, कोयना, दुआबांमध्येच राहणे पसंत केलेल्या कऱ्हाड्यांनी यादव कालखंडात बरेच कर्तृत्व दाखविले. 'यादवकालीन राज्य, समाज आणि चक्रधर स्वामी' या महत्त्वपूर्ण लेखात प्रा. ब्रह्मानंद देशपांडे यांनी देवगिरी यादव कालखंडातील मान्यवर प्रमुख ब्राह्मण समाजाची यादी पृष्ठ 73 वर दिली आहे. त्यामध्ये कऱ्हाडे ब्राह्मणांचा स्पष्ट उल्लेख आहे. हा लेख महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातून प्रकाशित केलेल्या 'श्री चक्रधर दर्शन' या (प्रकाशन इ. स. 1982) पुस्तकात आहे. विठ्ठलाला व कऱ्हाडे ब्राह्मणांना एखादेवेळी आणि प्रेमाने कानडी म्हटल्याने त्यांचा महाराष्ट्रीयपणा तीळभरसुद्धा कमी होत नाही, उलट वाढतो. विठ्ठल कानडा आणि कऱ्हाडेही कानडे असे असतांना विठ्ठलाच्या प्राचीन प्रसिद्ध भक्तांमध्ये कऱ्हाडे ब्राह्मणांचे प्रमाण तौलनिक दृष्ट्या कमी कां ? ह्याचे उत्तर ब्राह्मणांच्या प्रखर शक्तिपीठपूजक स्मार्त वृत्तीमधे आहे.

## हेमाद्रि : (इ. स. 1290)

देवगिरी यादवांचा पंतप्रधान हेमाद्रि हा फार मोठा योद्धा, मुत्सद्दी, प्रशासक, कवी, वास्तुशास्त्रज्ञ, धर्मपंडित आणि विद्वान होता. 'हेमाडपंथी वास्तुशैली', मोडी लिपी आणि मुखवट्याच्या महालक्ष्मी व बाजरी पिकाची लागवड हे हेमाद्रीने महाराष्ट्राला दिलेले चिरस्मरणीय महत्त्वपूर्ण योगदान आहे. 'चतुर्वर्ग



चिंतामणी' हा त्याचा आचारप्रधान ग्रंथ प्रसिद्ध आहे. वैद्यक शास्त्रावर आयुर्वेद रसायन हा ग्रंथ त्यांनी लिहिलेला आहे. Yadavas and their Times by O. P. Verma या पुस्तकानुसार हेमाद्रीच्या वडिलांचे नाव कामदेव आणि गोत्र "वत्स" आहे. हेमाद्रिचे अष्टपैलू उत्तुंग व्यक्तिमत्त्व सर्वांनाच हवेहवेसे वाटत असल्याने अनेक विविध ब्राह्मण समाजानी हेमाद्रि आमच्यातलाच, आमच्याच शाखेचा असा सद्भावपूर्ण दावा (Claim) केला आहे.

हेमाद्रि कर्नाटकी मूळ असणारे स्मार्त ऋग्वेदी ब्राह्मणच म्हणजे कऱ्हाडे ब्राह्मण होते. हे खालील पुराव्यांवरून निर्णायक रीतीने सिद्ध होणारे ठरेल.

1. लीळा चरित्रामध्ये हेमाद्रिचा उल्लेख नेहमी 'हेमाडी पंडित' असाच आला आहे. (उ. लीला 520, 545) पूर्वी पंडितांना त्यांच्या मूळ गावावरून नाव मिळे.

   "हेमाडी" हे कर्नाटकाच्या दक्षिण कॅनरा जिल्ह्यात गाव आहे. Hemmady पिन कोड 576249. हेमाद्रीचे पूर्वज हेमाडी गावातले आहेत. कऱ्हाडे ब्राह्मणांच्या आद्य स्थलांतरापूर्वी 'हेमाडी' गावाला रहात होते, हे सहज मान्य होण्यासारखे आहे. या संदर्भात सर्व मूळ महानुभाव पोथ्यांमध्ये हेमाद्रिचा उल्लेख 'हेमांडी' पंडित असा आहे, हेमाद्रि पंडित असा नाही, हे लक्षात घेणे जरूरी आहे.
2. हेमाद्रि, शेषाद्री अशी नावे आजही कर्नाटकात आढळतात.
3. बऱ्याच वास्तुशास्त्र अभ्यासकांच्या मते हेमाडपंथी वास्तुशैली कर्नाटकातील बेलूर–हालेबीड देवळांमधील वास्तुशैलीवरून विकसित झाली आहे.
4. मोडी लिपी मराठी देवनागरी लिपीवरील कानडी लिपीच्या प्रभावामधून निर्माण झालेली वाटते.
5. हेमाद्री हे शैव–वैष्णव या वादावादीत न गुरफटलेले स्मार्त ऋग्वेदी ब्राह्मण होते. महालक्ष्मीवरील त्यांची भक्ती त्यांच्या स्मार्त प्रकृतीमधून निर्माण झालेली आहे.
6. हेमाद्रि हे संपूर्णपणे शाकाहारी होते. मांसाहारी अथवा मत्स्याहारी मुळीच नव्हते, हे त्यांच्या चतुर्वर्ग चिंतामणी ग्रंथावरून निर्विवादपणे सहज दिसून येते.
7. हत्ती या प्राण्याबद्दल आणि हत्तीसेनेबद्दल हेमाद्रींना उत्कृष्ट ज्ञान होते, ही बाब त्यांच्या कर्नाटकीय उगमास सुसंगत आहे.
8. तात्पर्य : हेमाद्रि हे कानडी मूळ असणारे स्मार्त ऋग्वेदी ब्राह्मण म्हणजेच कऱ्हाडे ब्राह्मण होते. हेमाद्रिनी महाराष्ट्राला दिलेले योगदान हे पर्यायाने कऱ्हाडे ब्राह्मणांनी महाराष्ट्राला दिलेले योगदान आहे.

## चक्रधर स्वामी

1. डॉ. वि. भि. कोलते, डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. पंगू, बाळकृष्ण शास्त्री महानुभाव या सर्व विद्वानांच्या मते महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी हे जन्माने सामवेदीय लाड ब्राह्मण होते.

2. 'महानुभाव पंथाचे संस्थापक कऱ्हाडे चक्रधर हे कऱ्हाडेच होते' –प्रा. पा. श. माईणकर, स. म. कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नागपूर सुवर्ण महोत्सव स्मरणिका पृ. 13. "फलठाणी कराड्या ब्राह्मणाच्या घरी अवतारू स्वीकारू –महानुभाव स्थान पोथीमधील एकांक.

ही वरील दोन्ही विधाने खरी आहेत. हेही खरे, तेही खरे, हे कसे ?

याचे उत्तर चक्रधर स्वामींच्या चरित्रात आहे. चक्रधर स्वामी हे भडोच येथे सामवेदीय लाड ब्राह्मण कुटुंबात जन्मले. त्यांच्या पित्याचे नाव विशालदेव. बऱ्याच वर्षांनी, अनेक नवसासायासानी विशालदेवांना पुत्र झाला. त्यांचे नाव हरिपालदेव. हा एकुलता एक पुत्र दुर्दैवाने अकाली मेला. त्याचे शरीर स्मशानात नेले आणि त्यास अग्नी देणार एवढ्यात फलटण (जिल्हा सातारा) येथील चक्रपाणी नामक कऱ्हाडे ब्राह्मण हटयोग्यांनी आपला पूर्वीचा देह त्याग करून हरिपाल देवाच्या देहात प्रवेश केला आणि काय आश्चर्य ! हरिपालदेव जिवंत होऊन उभा राहिला आणि पुढे चक्रधर स्वामी म्हणून प्रसिद्ध झाला.

महानुभाव पंथात सर्वमान्य असलेल्या चक्रधर स्वामींच्या या चरित्र भागानुसार चक्रधर स्वामींचे शरीर हे शंभर टक्के सामवेदीय लाड ब्राह्मण होते आणि त्यांचा आत्मा शंभर टक्के कऱ्हाडे ब्राह्मण होता. असे हे शरीर व प्राण याच्या दैवी ऋणानुबंधाचे अभिनव उदाहरण आहे. देवगिरी यादवांच्या कालखंडात कऱ्हाडे ही एक मान्यवर ब्राह्मण शाखा होती, हे या चक्रधर स्वामींच्या चरित्राने अनायासेच सिद्ध होते.

देवगिरी यादवांच्या दुर्दैवी अस्तानंतरसुद्धा बहामनी व बहामनीच्या खंड राज्यात कऱ्हाडे ब्राह्मणांनी बदलत्या परिस्थितीत वाढत्या परिस्थितीनुसार कर्तृत्व गाजवले त्यामुळे त्यांच्यात देसाई, सरदेसाई, पोतदार, सरपोतदार, सबनीस, कारखानीस, इनामदार, सरदेशपांडे, सरमुकादम अशी वतनदारी दर्शक फारशी शैलीची आडनावे आढळून येतात.

## शिवशाही–कालखंड

1. केशव पंडीत हे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक राज पुरोहित होते. ते कऱ्हाडे ब्राह्मण होते.



2. पेशवाईच्या सुरुवातीच्या काळात कऱ्हाडे ब्राह्मणांमध्ये चित्पावन राजकर्त्यांशी जवळीक वाढविण्याचे प्रकार नैसर्गिक अभावितपणे झाले असावेत. त्यामुळे बऱ्याच कऱ्हाडे व चित्पावन आडनावात पराकाष्ठेचे साम्य दिसून येते. उदा :– आठवले–आठले, कानिटकर–कानेटकर. हेमाद्रीच्या कालखंडात कऱ्हाड्यांमध्ये प्रगट झालेल्या मुखवट्यांच्या महालक्ष्म्यांची जागा पेशवाईनंतर परत खड्यांच्या महालक्ष्म्यांनी घेतली असावी, असे म्हणतात.

चित्पावनात व देशस्थामध्ये अनंतपूजा कऱ्हाड्यांमधून आली असे पंडित महादेवशास्त्री दिवेकरांनी म्हटले आहे. कऱ्हाड्यांमधील अनंत पूजेचे प्रस्थ त्यांचा कर्नाटकी उगमाचा जिवंत जागता पुरावा आहे.

3. थोरले बाजीराव फार गुणग्राहक होते. गोविंदपंत खेर या कऱ्हाडे ब्राह्मण गृहस्थामध्ये पराक्रम व सद्गुण त्यांनी हेरले व त्याला सरदार केले. बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल यास बाजीरावांनी अलाहाबादच्या नबाबापासून वाचविले. त्यामुळे छत्रसाल राजाने आपल्या बुंदेलखंड राज्याचा एकतृतीयांश भाग बाजीरावास बक्षीस दिला. (इ. स. 1729) या बुंदेलखंडातील मिळालेल्या राज्यभागावर बाजीरावांनी गोविंदपंत खेरांची कामाविसदार म्हणून नेमणूक केली. त्यामुळे गोविंदपंतांना बुंदेले हे अभिधान मिळाले.

गोविंदपंत बुंदेले हे एक शूर योद्धे व समर्थ प्रशासक होते. त्यांनी सागर हे शहर वसविले. सागरला गोविंदपंत बुंदेल्यांनी खूप कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबांना आणून वसविले. या स्थलांतरित कऱ्हाडे कुटुंबांची संख्या इतकी जास्त होती की, त्यास हे कऱ्हाडे ब्राह्मणांचे सागर म्हटले जाई. झाशी, इंदोर परिसरात झालेले हे 'तृतीय स्थलांतर' म्हणता येईल. पुण्यामध्ये अनावश्यक स्पर्धेमध्ये उतरण्यापेक्षा महाकोशलचे मोकळे रान बरे असे बऱ्याच कऱ्हाड्यांना वाटले. झाशीच्या राणी लक्ष्मीबाई या कुलदैवताच्या दर्शनासाठी कोकणात गेल्या असतांना अनेक कऱ्हाडे ब्राह्मण त्यांच्याबरोबर उत्तर प्रदेशात आले.

महान शक्तिपूजक आणि मातृभक्त कऱ्हाडे ब्राह्मणांच्या स्मार्त वृत्तीचे दैदिप्यमान अत्युच्च प्रतीक म्हणजे झाशीच्या राणी लक्ष्मीबाई. इ. स. 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामातील राणी लक्ष्मीबाईचे प्रचंड शौर्य हे भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिल्या गेले आहे. हातात तलवार आणि पाठीशी बांधलेले तान्हे मूल हे लक्ष्मीबाईचे स्वरूप शौर्यही दर्शविते आणि वात्सल्य व पुढील पिढीच्या भवितव्याच्या बद्दलची प्रखर जागृतताही स्पष्ट करते.

ब्रिटिश काळात या सागरच्या कऱ्हाडे ब्राह्मणांना सागरचे या अर्थाने "सागेरीयन" किंवा सगेरियन ब्राह्मण म्हणून संबोधल्या जाई. सागर परिसरातून ही कुटुंबे कालमानानुसार काशी, जबलपूर, नागपूर, इंदोर, ग्वाल्हेर आदि शहरात गेली. छत्तीसगड मधील रायपूर, बिलासपूर, बालाघाट, या भागात पण बरीच कुटुंबे आहेत. राज्य उपभोगल्यामुळे आणि हिंदी भाषेच्या प्रभावामुळे या कऱ्हाड्यांमध्ये वेगळी अशी लोभस दरबारी जिंदादिली आली आहे. नागपुरात हे महाकौशलीय कऱ्हाडे ब्राह्मण आणि पश्चिम महाराष्ट्रातील कऱ्हाडे ब्राह्मण यांच्या पुनर्मीलनाने संयुक्त मध्यप्रांत कऱ्हाडे ब्राह्मण संघाची स्थापना झाली.

स्वातंत्र्य संग्रामात कऱ्हाडे ब्राह्मणांनी भरीव योगदान दिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. गोळवलकर गुरुजी, बाळासाहेब खेर, आचार्य जावडेकर, माळवणकर, निस्पृहकार कानेटकर अशी बरीच नावे या संदर्भात देता येतील.

## स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्योत्तर काळातील विविध क्षेत्रांमध्ये कऱ्हाडे ब्राह्मण आपल्या कर्तृत्वाने तळपत आहेत.

1. **लोकसंख्या** : कऱ्हाडे ब्राह्मणांची लोकसंख्या एक लाखाच्या आसपास असावी. रत्नागिरी, राजापूर, सावंतवाडी, मालवण, गोवे, खानापूर, कोल्हापूर, सातारा भागात त्यांची विशेष वसाहत आहे. सागर, झाशी, ग्वाल्हेर, इंदोर, नागपूर, बडोदा इत्यादी गावांत सैगेरियन कऱ्हाडे ब्राह्मणांची बरीच वस्ती आहे. मुंबई, पुणे व नागपूर या महानगरात कऱ्हाड्यांची घरे झपाट्याने वाढत आहेत. महादेवशास्त्री दिवेकारांच्या मते भट्ट प्रभु व पंधे या कऱ्हाडे ब्राह्मणांच्या गोवा परिसरातील पोटजाती आहेत.

2. **रंगरूप** : "Karhades : as a class they are darker, less well featured and sturdier than Kokanasthas" असे ठाणे डिस्ट्रीक्ट गॅझेटियरमध्ये असले तरी प्रत्यक्षात कऱ्हाडे रंगाने गोरे नसले तरी गव्हाळ, नाकीडोळी नीटस, तरतरीत, त्यामुळे एकूण लोभनीय व आल्हादकारक दिसतात.

3. **अध्ययन वेद व कुलाचार** : बहुतेक कऱ्हाडे स्मार्त, अद्वैत मतानुयायी आहेत. सर्वच कऱ्हाडे ऋग्वेदी आश्वलायन सूत्री शाकल शाखीय आहेत. कऱ्हाड्यांच्या अध्ययन वेदाबद्दल कुठलीही संदिग्धता नाही, कुठलाही वाद नाही.



कऱ्हाड्यांमध्ये मामेबहिणीशी विवाह होऊ शकतो. पण ते फारसे भूषणास्पद आणि चांगले समजल्या जात नाही.

कऱ्हाड्यांची कुलदेवता कोल्हापूरची महालक्ष्मी आहे. शान्तादुर्गा, म्हाळसा, अजादुर्गा इत्यादी त्यांच्या कुलदेवता आहेत. देवीभक्ती ही कऱ्हाड्यांची विशेषतः आहे. त्यामुळेच कऱ्हाडे स्मार्त आहेत. अनंत चतुर्दशी, ललिता पंचमी, चंपाषष्ठी, नवरात्र हे कऱ्हाड्यांचे प्रमुख सण व कुलाचार आहेत. कऱ्हाड्यांमध्ये बोडण नाही. विवाह झाल्यावर पाच वर्षे लक्ष्मीपूजन करण्याची चाल नाही.

4. **जावई प्रेम** : कऱ्हाडे ब्राह्मणांमध्ये मातृका म्हणून जी कुलदेवता आहे तिला नवरात्रात किंवा दसऱ्याला बली किंवा नरबळी देण्याची चाल या समाजात होती, असा आरोप केल्या जातो. प्रत्यक्ष जावयाचा बळी देणे हे कऱ्हाडे सर्वाधिक पुण्याचे, भूषणाचे व अग्रपसंतीचे मानतात, असा एक पराकाष्ठेचा हानिकारक अपसमज संपूर्ण महाराष्ट्रात खूप दूरवर आणि खूप खोलवर पसरला आहे. हा या समाजाबद्दल असलेला जवळपास एकमेव परंतु अतिगंभीर अपसमज आहे. हा अपसमज सपेशल चुकीचा आणि संपूर्णपणे आधाररहित आहे. कऱ्हाड्यांमध्ये देवीभक्ती असली तरी तांत्रिकता किंवा अघोरीपणा तीळमात्रही नाही. कऱ्हाड्यांनी जावयाचा किंवा कोणाचाही बळी दिल्याचे अपवाद म्हणून सुद्धा ऐकिवात नाही. पोलिस–दप्तरी नोंदल्या गेलेले नाही. इतर सर्व भारतीयांप्रमाणे कऱ्हाडे ब्राह्मण जावयावर मनःपूर्वक प्रेम व लोभ करतात. जावयाकरिता ते प्राण देतील, जावयाचा प्राण कदापि घेणार नाहीत आणि लेकीला विधवा करणार नाहीत. ज्ञानकोषकार श्री. व्यं. केतकरांच्या मते आन्तरशाखीय विवाहामध्ये पोटशाखांच्या तुलनेने कऱ्हाडे अधिक आघाडीवर आहेत. "महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे निरनिराळे भेद एकत्र करण्याचे श्रेय कऱ्हाड्यात जसे आहे." (भा. स. शा. पृ. 243). एकाही आंतरशाखीय विवाहामध्ये कऱ्हाड्यांनी जावयाचा बळी दिल्याचे उदाहरण शोधून शोधूनसुद्धा सापडत नाही. शाखा अंतर्गत असो किंवा आंतरशाखीय विवाह असो कऱ्हाडे जावयाला V.I.P. प्रमाणे वागवतात याबद्दल तीळभरसुद्धा संशय नाही.

5. **आडनावे** : कऱ्हाड्यांमध्ये पाचशे पंचेचाळीस आडनावे असून चोवीस गोत्रे आहेत. दोनशे दोन आडनावांच्या पुढे 'कर' हा प्रत्यय येतो. नानिवडेकर, भातवडेकर, पूर्णवडेकर, वडेकर अशी वडे शब्दयुक्त आडनावे पण बरीच दिसून येतात.

मोघे "मोघे हे नाव कऱ्हाडे व्यतिरिक्त अन्य ब्राह्मण शाखांमध्ये आढळत नाही. मोघेः मोग्धा म्हणजे विशिष्ट प्रकारचे भांडे. कन्नड भाषेत मोघेचा अर्थ मातीचे भांडे असा आहे." –मराठी आडनावे डॉ. रामगोपाल सोनी पृष्ठ 157 डॉ. सोनींच्या मतानुसार मोघे आडनाव कऱ्हाडेंच्या कानडी उगमाचे द्योतक आहे असा निष्कर्ष निघतो. शासकीय कन्नड मराठी शब्दकोषानुसार मोघ म्हणजे तोंड (Opening) मोघे म्हणजे लहान तोंडाचे भांडे. त्याचा सूचित अर्थ :– कमी बोलणारा, मितभाषी, कमी जेवणारा, कमी आहार असणारा. मोघे हे वैशिष्ट्यपूर्ण आडनाव कऱ्हाड्यांच्या उगमाप्रमाणे त्यांच्या मितभाषी स्वभावाचे व संतुलित मित आहाराचे दर्शक आहे. कोकण आणि शिलाहार राजवंशाशी इतके घनिष्ठ संबंध असूनही कऱ्हाड्यांमध्ये "वर्तक" हे आडनांव दिसून येत नाही.

6. **स्वभाव गुणदोष** : कऱ्हाडे ब्राह्मणांच्या स्वभावातील जडणघडणाला त्यांना करावी लागलेली तीन–चार क्लेशविरहित स्थलांतरे बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहेत. "घाटावरचा अस्ताव्यस्त व संपन्न देशस्थ दरिद्री कोकणचा रहिवासी झाला आणि टापटीप शिकला. देशस्थी बडेजाव आणि कोकणस्थी काटकसर या मधून नीटनेटक्या टापटिपीच्या कऱ्हाड्यांचा उगम झाला." या शब्दांत धर्मभूषण सुरेश शेवड्यांनी स्थलांतर आणि स्वभाव निर्मितीमधील संबंध स्पष्ट केला आहे.

कऱ्हाड्यांच्या स्वभावाचे वर्णन फक्त एकाच शब्दात करावयाचे असल्यास ते "समशीतोष्ण" या शब्दात करता येईल. अनेक गुणांचा सुवर्णमध्य आणि इष्टतमता ही कऱ्हाड्यांची विशेषता आहे. कऱ्हाडे फार गोरे नाहीत. फार काळेही नाहीत. फार उंच नाहीत, फार ठेंगूही नाहीत, फार कंजूष नाहीत, फार उधळे नाहीत, स्वभावाने फार तापट नाहीत, फार थंड व सुस्तही नाहीत. बहुसंख्य कऱ्हाडे मध्यमवर्गीय नाकासमोर चालणारे, कोणाच्या अध्यात ना मध्यात असे आहेत. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक आणि आततायीपणा कऱ्हाड्यात दिसून येत नाही. न. चिं. केळकरांनी "कऱ्हाडे हे टापटीपीने वागणारे सफाईदार व व्यवहारचतुर असतात" असे लिहिले आहे. लोकमान्य टिळकांनी "जेथले तेथे, त्याचे त्याला, जेव्हाचे तेव्हा" हे कऱ्हाड्यांच्या यशाचे सूत्र आहे, असे म्हटले आहे. 'कऱ्हाड्यांमध्ये कर्तव्यदक्षता, एकमार्गीपणा आणि स्वाभिमान हे गुण आढळतात.." "कऱ्हाडे हे बुद्धिमान आहेत" असे पंडित महादेवशास्त्री दिवेकरांनी म्हटले आहे. मध्यप्रदेश राज्याबाहेरील कऱ्हाडा ब्राह्मण हा सामान्यतः



गोळवलकर गुरुजींच्या सुपरिचित व्यक्तिमत्त्व–मूर्तीप्रमाणे सुशान्त, स्थितप्रज्ञ, समतोल कोणत्याही परिस्थितीमुळे विचलित न होणारा धीर गंभीर असतो. विनोद आणि खट्याळपणा कऱ्हाड्या ब्राह्मणांना फारसा आवडत नाही असे म्हणतात. त्यामुळे सरवटे आणि सप्रे यांच्या सारखे विख्यात उत्कृष्ट व्यंगचित्रकार या समाजात कसे निर्माण होऊ शकले याचे बऱ्याच जणांना स–आनंद आश्चर्य वाटते.

भांडखोरपणा आणि अहंमन्यता हे कऱ्हाड्यांचे दोष आहेत असे काही लोक म्हणतात, परंतु ते प्रत्यक्षात दिसून येत नाही. "तुटे वाद संवाद तो हितकारी" असे कौशल्य कऱ्हाडे ब्राह्मणांत दिसून येते" –चंद्रशेखर फडणीस (तरुण भारत 23.3.1980) अजातशत्रू व्यक्तीचे प्रमाण कऱ्हाडे ब्राह्मणांमध्ये बरेच आहे. सामान्यतः कऱ्हाडे ब्राह्मण हे दीर्घायुषी असतात.

पश्चिम भागातील कऱ्हाडे आतल्या गाठीचे आणि काहीसे अबोल असतात, असेही त्यांच्याबद्दल बोलल्या जाते. कऱ्हाडे हे पलायनवादी आहेत, असाही आरोप त्यांच्यावर कधी कधी केल्या जातो.

सागर परिसरातील गोविंदपंत बुंदेले यांच्या प्रेरणेने स्थलांतरित झालेल्या कऱ्हाडे कुटुंबामध्ये राजसत्ता उपभोगल्यामुळे व हिन्दी प्रदेशातील वास्तव्यामुळे काही आगळे विशेष दरबारी सद्गुण प्रगट झाले आहेत. एक जिंदादिली, एक दरबारी ऐट, एक रसिकता, मनमोकळेपणा, जीवनाबद्दल निर्धास्त, आत्मविश्वासी दृष्टिकोन निर्माण झाला आहे. "कहिए दद्दा, मिजास कैसा है ?" असे एकमेकांना नेहमी विचारत असतात. सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या "तुझे आहे तुजपाशी" या प्रसिद्ध नाटकातील काकाजी हे व्यक्तिचित्र या सागर, इंदोर भागातील कऱ्हाड्यांचे प्रातिनिधिक आहे, असे बऱ्याच जणांना भासते.

7. **पत्रकारिता** : वृत्तपत्र संपादन व पत्रकारिता या क्षेत्रात कऱ्हाडे ब्राह्मणांना विशेष रुची आहे. नागपूर टाइम्सचे अ. गो. शेवडे, तरुण भारताचे माडखोलकर, हितवादचे परांडे, फणशीकर, निःस्पृहकार– कानेटकर, महाराष्ट्र टाईम्सचे टिकेकर, बाळशास्त्री जांभेकर असे अनेक श्रेष्ठ आदरणीय पत्रकार कऱ्हाडे ब्राह्मणांनी महाराष्ट्राला दिले आहेत.

8. **पाकसिद्धी** : कऱ्हाडे ब्राह्मणांवर अन्नपूर्णा प्रसन्न आहे. "They are the best cooks of all Deccan" असे सोलापूर डिस्ट्रीक्ट ग्याझेटीयरमधे म्हटले आहे. कऱ्हाडे बाईंनी केलेल्या स्वादिष्ट आणि पचनास हलक्या धिरड्यांचा उल्लेख लीळाचरित्रात आहे. कऱ्हाडे स्वयंपाक फार खमंग करतात. कॅटरिंगच्या

धंद्यात कऱ्हाड्यांनी नाव काढले आहे. मुंबईचे काका तांबे, नागपूरचे नानिवडेकर, घुगरे, जावडेकर, कमलाताई आंबेकर, पुण्याचे डिगणकर ही नावे या क्षेत्रात प्रसिद्ध आहेत.

वडा हा पदार्थ मुख्यतः कर्नाटकी दक्षिण भारतीय आहे. उत्तर भारतात भजे, पकोडे, बोंड असे शब्द आहेत. या सर्व उत्तर हिन्दुस्थानी पदार्थांचे द्रवपीठ (Direct) कढईच्या तेलात टाकले जाते. वड्यामध्ये (Wet grinding) ते ओले कुटून वाटून निर्माण केलेले घट्ट द्रवपीठ थापून त्याचा वट–वडा थापल्या जातो व तो मग तळल्या जातो. वडे थापायला व तळायला थोडेसे कौशल्य लागते. वडेयुक्त आडनावांची रेलचेल कऱ्हाड्यांच्या कर्नाटकी उगमाचे आणि पाक कौशल्यांचे निदर्शक आहे.

सारस्वत आणि चित्पावन यांच्या तुलनेने कऱ्हाडे भगिनी स्वयंपाकात ओले नारळ आणि कोकम यांचा उपयोग कमी करतात. पूर्वी कऱ्हाडे भगिनी भातामध्ये भात शिजवतांनाच मीठ टाकीत. अजूनही बऱ्याच ठिकाणी टाकतात. "आवडत असल्यास भात शिजवतांना थोडे मीठ टाकावे" हे वाक्य "रूचिरा" या सुप्रसिद्ध पुस्तकाच्या लेखिका चित्पावन भगिनी सौ. कमलाबाई ओगले यांनी या कऱ्हाडे पाक पद्धतीवर अन्याय होऊ नये म्हणून टाकले असावे, असे म्हणतात. "रूचिरा", लेखिका –सौ. कमलाबाई ओगले मुद्रक व प्रकाशक मुं. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, पुणे. बारावी आवृत्ती 1978, पृष्ठ क्र.2. भात शिजवतांना त्यात मीठ टाकण्याची पद्धत ही कर्नाटक उगमाची खूण असल्याची समजले जाते.कऱ्हाड्यांचा स्वयंपाक मिळमिळीत कधीच नसतो अत्यंत चविष्ट असतो. कर्नाटकात इडली दोसा यांच्या प्रभावाची सुरूवात कऱ्हाडे तेथून स्थालांतरित झाल्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर झाली. त्यामुळे इ. स. 1920 पर्यंत कऱ्हाडे भगिनींना दोसा–इडली हे पदार्थ फारसे परिचित नव्हते. आयुर्वेदिक औषधी निर्मितीमध्ये कऱ्हाडे ब्राह्मण अग्रेसर आहेत. विकोचे पेंढारकर, सांडू, पनवेलचे पुराणिक ही या क्षेत्रातील उल्लेखनीय नांवे आहेत.

**9. कऱ्हाड्यांमधील दहा महान व्यक्ती** : विविध क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या कऱ्हाडे ब्राह्मणांची जंत्री करावयाची म्हटल्यास ही संख्या अनेक शेकड्यांमधे जाईल. त्यामुळे इथे फक्त इ. स. 1700 पासून आजपर्यंतच्या तीनशे वर्षातील दहा प्रमुख टॉप टेन व्यक्तींची यादी दिलेली आहे. त्यामध्ये– 1. गोविंदपंत बुंदेले, 2. झाशीची राणी लक्ष्मीबाई, 3. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. गोळवलकर गुरुजी, 4. कविवर्य भा. रा.



तांबे, 5. उद्योगपती किर्लोस्कर, 6. विज्ञानमहर्षी जयंत नारळीकर, 7. मुंबई इलाख्याचे पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, 8. ग. त्र्यं. माडखोलकर, 9. महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, 10.अनंत गोपाळ शेवडे ही नावे देता येतील. (या यादीतील विविध त्रुटींबद्दल उदारपणे क्षमा करावी, ही नम्र प्रार्थना.) वि. वा. आठल्ये यांनी त्यांच्या "कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास" या ग्रंथात 60 प्रसिद्ध साठ कऱ्हाडे ब्राह्मण व्यक्तींची यादी दिली आहे. ती वाचनीय व स्फूर्तिदायक आहे. श्री. वि. स. खांडेकर, संस्कृत प्रचार प्रणेते पं. सातवळेकर, भारताचे माजी गृहमंत्री श्री. गोविंदवल्लभ पंत, R.S.S चे सर संघचालक, प. पू. मोहनराव भागवत, कवी मोरोपंत, कवी यशवंत, इतिहासकार सरदेसाई, द. वा. पोतदार, श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी, डॉ. भडकमकर, तळेगावचे डॉ. सरदेसाई, अकोल्याचे डॉ. किबे असे अनेक नामवंत कऱ्हाडे समाजाने भारताला दिले आहेत.

कऱ्हाडे ब्राह्मण हा एक कर्तृत्ववान् सदाचारी ब्राह्मण समाज आहे. त्यांचा उज्ज्वल इतिहास विशाल भारताच्या राष्ट्रीय एकात्मता निर्मितीमध्ये उल्लेखनीय भर घालणारा आहे.

कऱ्हाडे ब्राह्मण हे अनेक सुसंगमाचे प्रतीक आहेत. कर्नाटकाचा महाराष्ट्राशी, कृष्णेचा कोयनेशी, कोकणचा देशाशी, महाकोशलचा विदर्भाशी अशा अनेक संगमाचे प्रतीक म्हणजे कऱ्हाडे. गोळवलकर गुरुजींच्या आध्यात्मिक संस्कृतीचा आणि विज्ञान महर्षी जयंत नारळीकरांच्या खगोलाला गवसणी घालणाऱ्या विज्ञान निष्ठेचा सहज सुंदर संगम कऱ्हाडे ब्राह्मणांमध्ये दिसून येतो.

**येथे या अध्यायाचे डॉ. अ. व्यं. सावजी यांचे लेखन-विवेचन पूर्ण झाले असून**

**आता येथून प्रा. सौ. अलकाताई खेर यांनी संकलित केलेल्या या अध्यायाच्या सूची अनुबंधाच्या मजकुरास प्रारंभ होत आहे.**

**आपला हा संपूर्ण वाचनप्रवास आनंदाचा व चिरस्मरणीय होवो.**

# सूची अनुबंध
## (Index Addendum)

पोटशाखेचे नांव : कऱ्हाडे ब्राह्मण

सूची अनुबंध संकलकाचे पूर्ण नांव व पत्ता : **सौ.(प्रा.) अलका अनंत खेर**

134, रामनगर, नागपूर–10


✆ : 522107

1) पोटशाखा समाजाची अंदाजे लोकसंख्या : 3,000,00

अक्षरात : तीन लाख

2) या लोकसंख्येचे अंदाजे वितरण

1. महाराष्ट्राच्या जिल्हावार नकाशात :




2. संख्याबल क्रमांकानुसार दहा गांवे

1. रत्नागिरी 2. मुंबई 3. ठाणे
4. नागपूर 5. पुणे 6. नाशिक




7. कोल्हापूर 8. सातारा–कऱ्हाड 9. सोलापूर
10. औरंगाबाद

3. महाराष्ट्राबाहेरील (परन्तु भारतात असणाऱ्या) पोटशाखा समाजाची लोकसंख्या उल्लेखनीय असणारी 7 गांवे

1. सागर (म.प्र.) 2. इंदौर (म. प्र.) 3. ग्वाल्हेर (म.प्र.)
4. झाशी (उ.प्र.) 5. रायपूर(छतीसगड.) 6. बडोदा (गुज.)
7. वाराणशी (उ.प्र.)

4. गोल घड्याळ आकृतीमध्ये पोटशाखा समाजाच्या लोकसंख्येचे अंदाजे वितरण.




100% =360%

## कऱ्हाडे ब्राह्मणांची गोत्रावळी

### गोत्रे व प्रवर

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | अत्रि | आप्यार्चनानसश्यावाश्वेति | त्रिप्रवरान्वित |
| 2. | आंगिरस | आंगिरसांबरीषयोवनाश्वेति | त्रिप्रवरान्वित |
| 3. | उपमन्यु | वसिष्ठेन्द्रप्रमदाभरद्वस्विति | त्रिप्रवरान्वित |
| 4. | काश्यप | काश्यपपावत्सारसितेति | त्रिप्रवरान्वित |
| 5. | कुत्स | आंगिरसमांधात्रकौत्सेति | त्रिप्रवरान्वित |
| 6. | कौंडिन्य | वसिष्ठमैत्रावरूणकौण्डिन्येति | त्रिप्रवरान्वित |
| 7. | कौशिक | वैश्वामित्राघमर्षणकौशिकेति | त्रिप्रवरान्वित |
| 8. | गार्ग्य | आंगिरसशैन्यगार्ग्येति | त्रिप्रवरान्वित |
| 9. | गौतम | आंगिरसायास्यगौतमेति | त्रिप्रवरान्वित |
| 10. | जामदग्न्य | भार्गवच्यावनाप्नवानौर्वजामदग्न्येति | पंचप्रवरान्वित |
| 11. | नैध्रुव | काश्यपावत्सारनैध्रुवेति | त्रिप्रवरान्वित |
| 12. | पार्थिव | भार्गववैन्यपार्थेति | त्रिप्रवरान्वित |
| 13. | पार्थिव | वैश्वमित्रमाधुच्छंदसधानंजय्येति | त्रिप्रवरान्वित |

| | | |
|---|---|---|
| 14. बादरायण | आंगिरसपौरुकुत्स्यत्रासदस्यवेति | त्रिप्रवरान्वित |
| 15. भार्गव | भार्गवच्यावनाप्नवानिति | त्रिप्रवरान्वित |
| 16. भारद्वाज | आंगिरसबार्हस्पत्यभारद्वाजेति | त्रिप्रवरान्वित |
| 17. मुग्दल | आंगिरसभार्म्याश्वमौद्गल्येति | त्रिप्रवरान्वित |
| 18. लोहिताक्ष | वैश्वामित्रशाकलायनकौशिकेति | त्रिप्रवरान्वित |
| 19. वत्स | भार्गवच्यावनाप्नवानौर्वजामदग्न्येति | पंचप्रवरान्वित |
| 20. वसिष्ठ | कौण्डिन्यमैत्रावरूणवासिष्ठेति | त्रिप्रवरान्वित |
| 21. वैन्य | भार्गववैन्यपार्थेति | त्रिप्रवरान्वित |
| 22. वैश्वामित्र | वैश्वामित्राघमर्षणकौशिकेति | त्रिप्रवरान्वित |
| 23. शांडिल्य | शाण्डिलासितदैवलेति | त्रिप्रवरान्वित |
| 24. शालाक्ष | वैश्वामित्रशाकलायनकौशिकेति | त्रिप्रवरान्वित |

**विवाह ठरवितांना ज्या गोत्रांचे एकमेकाशी पटत नाही ती.**

1. अत्रि सर्व गोत्रांशी पटते
2. अंगिरस कुत्स, मुग्दल
3. उपमन्यु, कौडिन्य, वासिष्ठ
4. काश्यप, नैध्रुव, शांडिल्य
5. कुत्स, केवलांगिरस
6. कौंडिन्य, उपमन्यु, वासिष्ठ
7. कौशिक, त्रयोदय, पार्थिव, लोहिताक्ष विश्वामित्र, शालाक्ष
8. गार्ग्य,भारद्वाज
9. गौतम द्वादशपार्थिव
10. जामदग्न्य भार्गव, वत्स
11. नैध्रुव, काश्यप शांडिल्य
12. पार्थिव,गौतम
13. पार्थिव, कौशिक, लोहिताक्ष, वैश्वामित्र शालाक्ष
14. बादरायण सदर गोत्राखेरीज सर्वांशी पटते
15. भार्गव, जामदग्नि, वत्स
16. भारद्वाज, गार्ग्य
17. मुद्गल केवलांगिरस
18. लोहिताक्ष, कौशिक,त्रयोदशपार्थिव
19. लोहिताक्ष, वैश्वामित्र शालाक्ष
20. वत्स, जामदग्नि भार्गव
21. वासिष्ठ, उपमन्यु, कौंडिन्य
22. वैन्य सर्व गोत्रांशी पटते
23. वैश्वामित्र कौशिक, त्रयोदशपार्थि व लोहिताक्ष, शालाक्ष
24. शांडिल्य काश्यप, नैध्रुव
25. शालाक्ष,कौशिक त्रयोदशपार्थिव, वैश्वामित्र



### 3) आडनांवे व गोत्रावळी (मराठी आद्याक्षरक्रमानुसार) :

| आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| * अ,आ * | | आर्ज्ये | 4 | आंबडेंकर | 4 | का(को)ळेले | 10 |
| अखदे | 5 | आठलीकर | 7 | * क * | | | 11, 16 |
| अ(आ) गटे | 8 | आठल्ये(ले) | | कमलाकर | 16 | कां(का) जळे | |
| अ(आ) गटे | 16 | (ल्येकर) | 4,17 | कयाळ | 4,16 | (ल) | 7 |
| आगवेकर | 10 | आतवळकर | 20 | कस्करे(र) | 1 | कांजेकर | 16 |
| आगवेकर | 20 | आमोणकर | 1 | करमलकर | 17 | कांट्ये | 13 |
| अगळे | 13 | आर(रा)व | | करंबेळकर | 19 | कां(क)ड | |
| अधवले (वेल)– | | कर | 16 | कर्पे | 7,1 | (ट) दरे | 10 |
| कर | 20 | आर्डे(डर्ये) | 4,16 | कर्वे | 7 | कांदलणे | 4 |
| अजरेकर | 10 | आवरेकर | 1,2,10 | कलावंत | 16 | कांदल्ये | 4 |
| अज्ये | 1, 4 | आवळ(ल)कर | 16 | कलोवन | 16 | कित्तर | 7 |
| अठनलेकर | 7 | आळीकर | 4 | कशाळकर | 1 | किबे | 11 |
| अडिवरेकर | 7 | इमानदार | 8 | कशो(शा)ळकर | 4, | किरकिरे | 16 |
| (अद्ये, आडये) | 4 | उपाध्ये | 1,4,20 | | 6,7,16 | किराणे | 20 |
| (अद्ये, आडये) | 10 | उवर्जे | 20 | कळके | 1 | किर्लोस्कर | 16 |
| अधिकारी | 20 | उंब्राणीकर | 20 | काकिर्डे | 6 | किंजवडेकर | 44 |
| अध्यापक | 1 | उंबऱ्ये | 10,20 | काजरेकर | 1,16,19 | कीर्तने | 4 |
| अमृते | 10 | एकांडे | 20 | कात्रे | 4 | कुडके | 20 |
| अयने (नले) | | ओखदे(खरे) | 9 | कानडे | 4 | कुरणे | 4 |
| कर | 16 | ओझरकर | 4 | कानेकर | 16 | कुरावे | 24 |
| अयाचित | 16 | ओझे | 18,24 | काने(नि)टकर | 16 | कुलकरणी | 1, 4 |
| अये | 4 | ओरपे | 4 | | 21 | कुबळेकर | 4 |
| अरणे | 1 | ओविडेकर | 1 | कापडे(डि) | 10 | केरकर | 1 |
| अरव(र)कर | 16 | ओळकर | 8,10 | कामते(थे)कर | 1,4 | केवळेकर | 11 |
| असवडेकर | 4 | ओळतीकर | 20 | कारखानीस | 1 | केळकर | 1,17 |
| अळवणी | 10 | अंतरकर | 9 | कावने | 7 | कोटकर | 20 |
| आ(अ)गळे | 11 | अंबकर | 7 | काळ | 1,4,10, | कोटिभास्कर(र) | |
| आ(अ)गळे | 13 | अंबटेकर | 10 | काळे | 11,20,22 | | 10, 20 |
| आचार्य(ये) | 10,16,20 | आंबेकर | 1,4,7,20 | काळेलकर | 4 | कोनकर | 16, 24 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोनेकर | 16 | गोवारीकर | 23 | जावडेकर | 7,10 | * ढ * | |
| कोलथेकर | 16 | गोविलकर | 20 | जांभेकर | 7,22 | ढवळे | 20 |
| कोले | 16 | गोसामी(वी) | 16 | जोशी | 8,17 | ढेकऱ्ये(ऱ्ये) | 1 |
| कोल्हटकर | 16 | गोळवलकर | 4 | जोहारी | 4 | ढोकर(कर) | 10 |
| कोवाई | 9 | * घ * | | * झ * | | ढोज्य | 1 |
| कोळलकर | 4 | घगवे | 11,13 | झांशीवाले | | ढोरे | 1 |
| कोळंबकर | 15,16 | घरघरे | 16 | (झांजिले) | 9 | ढोले | 10,20 |
| कोंबेकर | 16 | घाटे | 1, 7 | * ट,ठ * | | * त * | |
| कंद्यर | 20 | घिद्रये | 1 | टणकर | 1 | तळवणकर | 20 |
| * ख * | | घुगरे | 10 | टिकेकर | 10,20 | तळवलकर | 7,20 |
| खानवी(न्व)लकर | | घोडे | 7 | टिं(बिं) बे | 10,20 | तळकर | 4,10 |
| | 1, 21 | * च * | | टेंगश | 1 | तळेकर | 1,20 |
| खाडीली(ल)कर | 10 | चणेकर | 4 | टेंब्ये(बे) | 1 | ताटकर | 16 |
| खांडेकर | 4,8, | चांदोरकर | 10,26 | टोळे(ळ) | 10 | ताटके(गे) | 4 |
| | 16,20 | चिकणे(ण्ये) | 16 | टोके(क)कर | 1 | ताडगे | 10 |
| खुबळे | 4, 16 | चिटणिस | 1 | ठकार | 4 | तांबे | 8,9,17 |
| खेर | 9 | चिरपुटकर | 16 | ठाकूर | 1,4,7 | तितके | 10 |
| खेरकर | 20 | चिरमु(मुं) | 4 | | 10,11,16,20 | तुळशुलकर | 7 |
| खंडकर | 20 | चिचा(च)ळकर | 1 | * ड * | | तुळसुले | 7 |
| * ग * | | | 11,20 | डगळ्ये(डंगळे) | 16 | तोताडे | 20 |
| गगनग्रास | 16 | चिंचुरे | 7 | डांगे | 4 | तोफखाने | 4 |
| गग्ये | 4 | चिद्रे | 5 | डिके(क्ये) | 3 | * द,ध * | |
| गणपत्ये | 16 | चुणेकर | 7 | डिकेकर | 20 | दत्ते | 1 |
| गर्दे | 10,16,20 | चौकर | 4 | डिगऱ्ये | 1 | दक्षिणदास | 20 |
| गलगले | 7 | चंद्रशेखर | 7 | डिगणकर | 1 | दाणे | 20 |
| गलांड्ये | 16 | * ज * | | डेगवेकर | 4 | दाभो(भा)ळे | 7,21 |
| गागळकर | 7 | जठार | 11 | डेंगशे | 1 | दिवाण | 4 |
| गुणे | 1 | जड्ये | 16 | डोकशे | 11 | दीग | 11 |
| गुर्जर | 4,11 | जन्ये | 9 | डोंगरे (ऱ्ये) | 1, | दीक्षित | 11 |
| गोठणकर | 10,20 | जमेनिस | 4 | | 11,20 | दुबळे | 4 |
| गोठोस्कर | 16 | जान्हवेकर | 16 | डोऱ्ये | 20 | दुभा(मा) ळे | 16 |
| गोडे | 6 | जामदार | 16 | डंगळे | 16 | दुवेद(धे) | 1 |
| गोरे | 4 | जायदे | 10,16 | | | दुग्वेकर | 4 |



| आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दऊसकर | 7,8,16 | नानिवडेकर | 1 | परा(रे)ष्ठेकर | 1,10 | पोंभुर्लेकर | 8 |
| देऊळकर | 10 | नाफडे | 1,9 | पळनिटकर | 10 | पोव्हेकर | 16 |
| देव | 7,20 | नारगवंडी | 20,10 | पळसुले | 20 | पंडित | 1,2,3,4 |
| देवदारूकर | 4 | नारवे(व्ये) | 7 | पाटकर | 8 | | 7,8,11,16,23 |
| देवघरकर | 4 | नारळ(ळी)कर | 20,10 | पाटील | 8,10,17 | पंत | 20 |
| देवभक्त | 16 | नारिंगे | 20 | पा(प)डळकर | 20 | प्रभु | 16 |
| देवस(सी)कर | 20 | नार्लेकर | 16 | पात्कर | 1,20 | प्रभुदेसाई | 10, 20 |
| देवस्थळ(ळी) | 1, | नावर्लेकर | 10,20 | पाथरकर | 15 | प्राणी | 1 |
| | 10, 20 | नावेकर | 16 | पाध्ये(गुर्जर) | 11 | * फ * | |
| देशपांडे | 7 | नित्ते | 10 | पानवलकर | 1,10,20 | फ(फे)गरे | 20 |
| देसाई | 1,4,7 | निंगळे | 16 | पाथरपोटकर | 8 | फणशीकर | 16 |
| | 10,17 | निखडकर | 4 | पारिपत्यदार | 1 | फणशे | 1,7, |
| धवल | 20 | निखाड्य | 7 | पारगांवकर | 16 | | 10,20 |
| धाक्रस | 16 | निगुडकर | 4 | पालकर | 20 | फणसळ(सील)कर | |
| धाज्ये | 20 | निवसट(र)कर | 1 | पावणसकर | 1 | | 1, 10 |
| धामणकर | 2, 6 | निवाळे | 8 | पावनगडकर | 10 | फडणीस | 8 |
| धुपकर | 4,7,20 | निं(लिं)बाळकर | 9 | पाळेकर | 12 | फळणीकर | 10 |
| धोटे | 20 | निल्हेदर | 4 | पांगारकर | 4 | * ब * | |
| धापेश्वरकर | 1, | निव्हये | 7 | पांचळकर | 2,10 | बखरे | 10 |
| | 4,16 | नूलकर | 4, 10 | पित्रे | 20 | बखले | 16 |
| धों(धो) ड | 7,10,1 | नेमसे | 10 | पिंगे | 16 | बर्जे | 4 |
| * न * | | नेवाळकर | 9, 20 | पिंपळे | 14 | बलेकर | 8 |
| नवरे(न,म)श | 10 | * प * | | पुतिलकर | 1 | बवकर | 4 |
| ननरे | 16 | पटकर | 8 | पुराणिक | 1, 16 | बहुतुले | 4, 19 |
| नवाथे(थ्ये) | 11, | पटवर्धन | 4,11,16 | पुरोहित | 7 | बाक्रे(खे) | 10 |
| | 20 | पणकर | 26 | पुसाळकर | 1 | बखरे | |
| नळेकर | 1,20 | पत्की | 4, 16 | पेटकर | 1, 16 | बावनकर | 4,10,16 |
| नाईक | 1 | पंतवैद्य | 7 | पेंढ(ढा)रकर | 16 | बारामतीकर | 10 |
| नाखरे | 1,10 | पन्हाळकर | 8 | पोखर(खी)णकर | | बांधे | 21 |
| ना(र)ख्ये | 7 | प(र)खंडे | 16 | | 10 | बांधेकर | 4,20 |
| नाटे(कर) | 16 | पाध्ये | 4 | पोतदा(द्दा)र | 1 | बा(ब)बुळकर | 7 |
| नांदगांवकर | 4 | पराडकर | 4,10,17 | पोखटकर | 10 | बिनीवाले | 20 |
| ननल | 1,7,10 | परांडे | 10 | पोष्टेकर | 1 | बिरवाडकर | 4 |

| आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बुगे | 16 | मणेरी(रक)कर | 4,11 | * य * | | वर्ज(जे) | 4 |
| बुंदेले | 16 | मत्से | 10 | युक्ते | 11 | वडेकर | 4 |
| बेजकर | 7,20 | महाजनी | 1,4 | युप्पे | 20 | वरवडेकर | 10 |
| बेर्डे | 20 | माईणकर | 1 | येल्लापूरकर | 1 | वरेकर | 20 |
| बेलेकर | 8 | माडखोल(त)कर | 4 | योगी | 7 | वहाळकर | 10 |
| बेलवलकर | 10,20 | मानेकर | 4 | * र * | | वळभकर | 8 |
| बेळवी | 17 | मावळणकर | 7,11 | राऊत | 16 | वळतेकर | 20 |
| बेंदरकर | 23 | माहूलकर | 11 | राग्वत | 4 | वळनकर | 10 |
| बेंद्रे | 16 | माळी | 4 | राजवडकर | 4 | वळामे | 1 |
| बोकाडे | 1,20 | मिजोकर | 10 | राटकर | 7 | वाईकर | 10 |
| बोणकर | 4 | मिर्जोळकर | 10 | रामायणे | 20 | वाकणकर | 1,16 |
| बोंडाले(ळे) | 20 | मिरवणे(र्वण)कर | 1 | रायकर | 20 | वाखल्ले | 7 |
| बोंद्रे(दारे) | 16,20 | मिराशी | 4,8,16 | रिंगे | 6 | वाग्वरे | 20 |
| बोरवणकर | 4 | मुचीकर | 7 | रिसवडकर | 21 | वाघळकर | 7,16 |
| * भ * | | मुची(च)रकर | 16 | रुणकर | 10,20 | वाजिवरे(कर) | 4 |
| भट्ट(ठ) | 4,16 | मुजूमदार | 4 | रेंडे | 16 | वाध्ये | 21 |
| भडकमकर | 10 | मुटाटकर | 7 | रेणावीर | 16 | वायंगणकर | 4 |
| भडभडे | 14 | मुतवाडेकर | 20 | * ल * | | वायंधे | 11 |
| भागवत | 1,4,8 | मुठ्ये | 20 | लवाटे | 5 | | |
| | 10,16,17,20 | मुणगे(ग)कर | 1, | लवम्हणकार | 21 | वावकर | 16 |
| भाटे(ट्ये) | 1,8,9, | | 20 | लळित | 7, 20 | वाळवे | 7 |
| | 10,15 | मुर्णवडेकर | 1,20 | लावग(वग)णकर | | विंजे | 9 |
| भाघ्रे | 9 | मुरवणे | 10 | | 1, 21 | वेजेकर | 7,17 |
| भाटवडेकर | 10,19 | मुराट(टें) | 7 | लामगांवकर | 16 | वेळंबकर | 8 |
| भासल | 10 | मुर्वडेकर | 20 | लुकतुके | 10,20 | वैद्य | 7, 11 |
| भांडारी | 10,15 | मुळे | 1,4,9 | लोकरे (कऱ्ये) | 20 | वड्ये | 16 |
| भांड्ये | 9 | | 10,11,20 | लोपत्र्ये | 20 | * श * | |
| भु(भो)गळे(ळ्ये) | 11 | मुंडले | 4, 11 | लोवलेकर | 1 | शहाणे | 4,23 |
| भो(भु)पटकर | 9 | मेमणे(ण्ये) | 16 | ल(ल)वकरे | 1 | शिरगांवकर | 8 |
| भोंदे | 10 | मोका(क)दम | 13 | लकार्ये | 4 | शिवे(त) कर | 1,4 |
| * म * | | माघे | 17 | लवकार्ये | 4 | शेकदा(ग्दा) र | |
| मट(त)कर | 4 | मांडलीक | 4 | * व * | | (पंडित) | 1,7 |
| मंटपे | 20 | | | वजेकर | 16 | शेजवलकर | 1 |



| आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र | आडनांव | गोत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शेणोली | | सप्ते | 1 | सांडू | 10 | हुजुरबाजार | 1 |
| (ल)(ण्वल)कर | 7 | सप्रे | 1 | सांड्ये | 10,26,20 | हे(हि, ह) लेंकर | |
| शेंबेकर | 4,10,16 | सबनीस | 1,10 | सांवरेकर | 1,11 | | 13, 16 |
| शेंबवर्ण(ण)कर | 10 | सरमळकर | 4 | सुर | 20 | हेर्बांडकर | 8 |
| शेवडे | 1,10,16,20 | सरमोक(का)दम | 21 | सोनाल | 10 | | |
| शेष्येकंद | 4,10 | सरव(र्व)टे | 7,20 | स्वरमंडळी | 10 | | |
| शौचे | 20 | सर्वाण्ये | 20 | स्वादी | 10 | | |
| श्रीखंडे | 4 | साखरे | 1 | * ह * | | | |
| श्रोत्री | 1 | साध्ये | 20 | हयग्रीव | 16 | | |
| * ष * | | सातवळेकर | 20 | हर्डीकर | 9,16 | | |
| षाण्वलू | 1 | साधले | 1 | हळद्ये | 17 | | |
| * स * | | सानवल्यु | 1 | हळबे | 4,10,11 | | |
| सरदेश– | | सानाल | 10 | हर्षे | 7 | | |
| कुलकरणे | 4 | सायनेकर | 16 | हा(ह)डप | 7,20 | | |
| सरदेसाई | 1,7,8 | सारमांडलीकर | | हातिवलेकर | 1,12, | | |
| सरपोतदार | 1 | (ल्ये) | 10 | | 16 | | |
| सरदेशपांडे | 4 | सांगळकर | 4 | हिंगणीकर | 1 | | |
| | | | | हळवे | 10 | | |

## 4) ज्ञाति विषयक छापील साहित्याची सूची

| क्र | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव | प्रकाशकाचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| 1. | **कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास** | कै. वि. वा. आठल्ये | रत्नागिरी जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण संघ झाडगांव नाका–415612 |
| 2. | **आठले कुलवृत्तांत** | | |
| 3. | **गुणे कुलवृत्तांत** | | |
| 4. | **सरवटे कुलवृत्तांत** | | |
| 5. | **कऱ्हाडे ब्रा. संघ, (स्मरणिका)** | दि.वा. सुभेदार, | नागपूर.1928–1979 कॉंग्रेसनगर,,नागपूर |

### 5) ज्ञातिविषयक नियतकालिकांची सूची

| क्र | नियतकालिकाचे नांव व वारंवारता (Frequency) | कार्यालयाचा पूर्ण पत्ता |
|---|---|---|
| 1. | **कऱ्हाडे** (मासिक) | |

### 6) ज्ञातिसंस्थांची सूची

| क्र. | संस्थेचे पूर्ण नांव व पत्ता | अध्यक्ष व कार्यवाह |
|---|---|---|
| 1. | **कऱ्हाडे ब्रा. संघ**, रामकृष्णभवन 16, गिरगांव, मुंबई–400004 | |
| 2. | **कऱ्हाडे ब्रा. संघ**, सुभेदार हॉल, हंपियार्ड रोड, काँग्रेसनगर, नागपूर | |
| 3. | **कऱ्हाडे ब्रा. संघ**, द्व्व श्रीपाद हर्षे, बडोदा | |
| 4. | **रत्नागिरी कऱ्हाडे ब्रा. संघ,** सदाचार मंदिर, झाडगांव नाका–415612 | |
| 5. | **कऱ्हाडे ब्रा. संघ**, नाशिक | |
| 6. | **कऱ्हाडे ब्रा. संघ**, कऱ्हाडे ब्रा. सेवा संघ, समाज मंदिर, टिळक नगर, डोंबिवली(पूर्व) जि. ठाणे श्र : 440956 | |

**7) पोटशाखा समाजातील आजपर्यंतच्या इतिहासातील काही प्रमुख व्यक्ती (या यादीतील त्रुटी व चुकांबद्दल क्षमा करावी अशी विनंती.) बाह्य जगाला पोटशाखा समाज सहजतेने ओळखू येण्यासाठी –**

– गोविंदपंत बुंदेले (खेर)



– झाशीची राणी लक्ष्मीबाई
– बाळशास्त्री जांभेकर (पत्रकारिता)
– शं. वा. किर्लोस्कर (उद्योगपती)
– वि. स. खांडेकर (साहित्यिक)
– भा. रा. तांबे (कवि)
– जयंत नारळीकर (विज्ञान महर्षी)
– बाळासाहेब खेर (मुंबई इलाख्याचे प्रथम मुख्यमंत्री)
– प्रभाकर पणशीकर (नट)
– चंदू सरवटे (क्रिकेटपट)
– मोहनराव भागवत. RSS चे सरसंघचालक

||श्री||

**सौ. अलका अनंत खेर यांचा अल्पपरिचय**



मराठी विषयाच्या प्राध्यापिका. 1971 पासून कार्यरत आहेत. कऱ्हाडे ब्राह्मण समाजाच्या इतिहासाबद्दल अभिमान व आस्था असून प्रस्तुत कामात त्यांनी मदत केली आहे. वाचन, लेखन, कलाकौशल्य इ. आवड. कौटुंबिक व सामाजिक संबंध वृद्धिंगत करण्यामध्ये रुची. प्रवास व स्थलदर्शनाचीही आवड आहे. यजमान श्री. अनंत खेर थापर ग्रुप मधून कमर्शियल मॅनेजर म्हणून निवृत्त झाले. सध्या व्यवसायकर व प्राप्तीकर संबंधी सल्लागार व मर्सर्ट फायनान्स कंपनीत डायरेक्टर म्हणून काम बघतात. सौ. अलकाताई एक यशस्वी प्राध्यापिका आहेत. त्यांची भाषा प्रभावी व ओघवती आहे. कऱ्हाड्यांमध्ये अनंत पूजेचे महत्त्व फार आहे. सौ. अलकाताईंची "सगुण, स–आकार" अनंत पूजनावर अढळ श्रद्धा आहे.